आर.सी.सी. क्र.२८१/२०२२

नि.क्र. १६०

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १४ यांचा उर्वरित उलटतपास आरोपीकरीता विधीज्ञ श्री.ए.पी.रोकडे यांच्यामार्फतः**

आता मला माझा नि.९७ वरील तक्रारी अर्ज दाखवण्यात आला. त्या तक्रारी अर्जावर मी पेनाने तारीख टाकुन दिल्याचे दिसत नाही. हे म्हणणे खरे नाही की नि.९७ वरील तक्रारी अर्जावर मी पेनाने तारीख टाकुन दिल्याचे दिसत नसल्याने मी जो तक्रारी अर्ज पाठवला होता तो हा सदर अर्ज नाही.

प्रश्न– नि.९७ वरील तक्रारी अर्जावर तारीख नमुद नसल्याचे कारण काय?

उत्तर– मी ज्या तक्रारी अर्जावर पेनाने तारीख टाकली होती तो अर्ज माझ्यासोबत पिशवीतच राहीला व नि.९७ वरील तक्रारी अर्ज हा दुस–या लोकांच्या तक्रारी अर्जांसोबत पुढे गेला.

हे म्हणणे खरे नाही की मी जो तक्रारी अर्ज दिला तो कोणत्या तारखेला दिला हे निश्चित मला सांगता येणार नाही. मी सांगतो की तो तक्रारी अर्ज मी दि.६.३.२०२१ रोजी दिला. मी नि.९७ वरील तो तक्रारी अर्ज हेड ऑफीसला दिला होता, ब्रँच मॅनेजरला दिला नव्हता. ब्रँच मॅनेजर वडझीरे शाखा यांचेकडे मी तक्रारी अर्ज दिला होता परंतु मला त्याची तारीख माहीत नाही. ब्रँच मॅनेजर यांना दिलेला अर्ज व हेड ऑफीस यांना दिलेला अर्जातील मजकुर सारखा नव्हता, तो वेगवेगळा होता. ब्रँच मॅनेजर यांचेकडे दिलेल्या तक्रारी अर्जात मी विद्या मॅडम, कॅशीयर बोरुडे व मॅनेजर श्रीमती उघडे यांचे नाव टाकले नव्हते.

प्रश्न– ब्रँच मॅनेजर यांना दिलेल्या तक्रारी अर्जात तुम्ही बँक कर्मचा–यांची नावे टाकली नाहीत मात्र हेड ऑफीस यांना दिलेल्या अर्जात तुम्ही बँक कर्मचा–यांची नावे का टाकली?

उत्तर– कारण माझी फसवणुक ही बँकेतून झाली होती.

ज्यावेळी माझ्या खात्यातुन मला वडीलांच्या खात्यावर पैसे ट्रान्स्फर करायचे होते त्यावेळी बँकेत सर्व कर्मचारी उपस्थित होते. हे म्हणणे खरे आहे की मला पैसे ट्रान्स्फर करायचे असल्याने गौतम जाधव हा माझ्या गावातील असल्याने व बँक कर्मचारी असल्याने मी अगोदर त्याचेकडे गेलो. आरोपीचे आमच्या गावात बँक

कर्मचारी म्हणुन ऑफीस नाही. गौतम जाधव बँक मित्र होता की बँक कर्मचारी होता हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की घटनेवेळी माझा मोबाईल नंबर माझ्या अकाउंटला लिंक होता. माझ्या वडीलांचा मोबाईल नंबर त्यांच्या अकाउंटला लिंक नव्हता. मी माझा मोबाईल नंबर माझ्या अकाउंटला बँकेत फॉर्म भरुन लिंक केला. या अगोदरही मला बँकेतील व्यवहारांबाबत मेसेज यायचे. हे म्हणणे खरे आहे की दि.२/८/२०२२ रोजी मी पोलीसांना जबाब देण्याअगोदर माझे पैसे मला कधी मिळतील याबाबत मी बँक कर्मचा–यांना वारंवार विचारणा करत होतो. हे म्हणणे खरे नाही की बँक कर्मचा–यांनी मला माझे पैसे गौतम जाधवने काढुन घेतले आहे असे सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की दि.२/८/२०२२ रोजीच्या माझ्या जबाबात मी बँक कर्मचा–यांचे नाव न घेता केवळ गौतम जाधवचे नाव घेतले आहे.

प्रश्न– गौतम जाधवनेच हा फ्रॉड केला हेतुम्ही कशाच्या आधारे सांगता?

उत्तर– बॅकत जावुन गौतम जाधवने मला जी बँकेची प्रोसेस सांगितली की माझ्या नावाची विथड्रॉवल स्लीप भरुन द्या आणि वडीलांच्या नावाची सेव्हींग स्लीप भरुन द्या. गौतम जाधवने सांगितल्याप्रमाणे मी दोन्ही स्लीप भरुन दिल्या तरीही रक्कम मिळाली नाही म्हणुन गौतम जाधवने फसवणुक केल्याचे मी सांगितले.

हे म्हणणे खरे आहे की माझ्या खात्यावरुन वडीलांच्या खात्यावर पैसे वर्ग करण्याची प्रक्रिया मला माहीत नसल्याने मी गौतम जाधवला त्याबाबत विचारले होते. हे म्हणणे खरे आहे की गौतम जाधवने मला पैसे वर्ग करण्याची प्रक्रिया सांगितली म्हणुन मला वाटले की गौतम जाधवने हा अपहार केला. ज्यावेळेस मी बँकेत गेलो त्यावेळेस गौतम जाधव काउन्टरच्या आत बसला होता. हे म्हणणे खरे आहे की गौतम जाधवने मला स्लीप भरायला सांगितली व मी ती स्लीप भरुन कॅशीयर बोरुडे यांच्याकडे दिली होती. हे म्हणणे खरे नाही की ज्यावेळी मी बँक कर्मचाऱ्यांना माझ्या पैश्यांबाबत वारंवार विचारणा करत होतो त्यावेळी मला बँक कर्मचा–यांनी सांगितले की गौतम जाधवनेच हा अपहार केला आहे व तुम्ही त्याचे नाव जबाब देताना पोलीसांना सांगा. हे मला सांगता येणार नाही की पोलीसांसमोरील जबाब मी दिल्यानंतर मला माझे पैसे बँकेने परत दिले. माझे पैसे मला बँकेने व्याजासहीत एकुण रक्कम रु.१,५४,५००/– परत केले होते. ती रक्कम माझ्या खात्यावर जमा झाली होती. त्याबाबत माझ्या मोबाईलवर मेसेज आला

असेल, तसे मला निश्चित सांगता  येणार नाही.

हे म्हणणे खरे नाही की आरोपी माझ्या गावातील असल्याने मी लहानपणापासुन त्यास ओळखतो. आरोपीने उपकेंद्रामधुन माझ्याकडुन पैसे घेतले व ते पैसे मला परत दिले नाही, असे काही झाले नाही. सी.एस.सी. सेंटर हे पाडळीदर्या गावात असल्याचे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की बँकेच्या कामासंदर्भात मी ज्या ज्या वेळी आरोपीस भेटलो ते वडझीरे शाखेतच भेटलो होतो. हे म्हणणे खरे आहे की गौतम जाधव  यास पैसे वर्ग करण्यासाठी काय प्रक्रिया आहे हे विचारुन झाल्यानंतर माझ्या पैश्यांचा अपहार कसा झाला याबाबत मला वैयक्तीक माहीती नाही.

प्रश्न– तुमच्या  पैश्यांबाबत अपहार कसा झाला हे तुम्हाला वैयक्तीक माहीती नसल्याने तुम्ही तरीही केवळ गौतम जाधवचे नाव पोलीसांसमोरील जबाबात का घेतले?

उत्तर– मला पैसे वर्ग करण्यासंदर्भात गौतम जाधवने जी प्रक्रिया सांगितली होती त्याप्रमाणे मला माझे पैसे मिळाले नसल्याने मी गौतम जाधवचे नाव पोलीसांना सांगितले होते.

हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी माझा जबाब त्यांच्या पध्दतीने परस्पर टाईप करुन ठेवला व मी केवळ त्या जबाबावर सही केली होती. आरोपी केवळ उपकेंद्रातील बँक मित्र होता याबाबत मला माहीती नव्हती. वडझीरेतील गावक–यांनी वडझीरे शाखेतील बँक कर्मचा–यांविरुध्द आंदोलन केल्याचे मी ऐकुन आहे. ते आंदोलन होण्याअगोदर माझ्या रकमेचा अपहार झाला होता. आंदोलन झाल्यानंतर ज्या लोकांचे पैसे बुडाले आहेत ते पैसे त्यांना परत मिळणार होते याबाबत मला माहीती मिळाली नव्हती. आंदोलन झाल्यानंतर मी तक्रारी अर्ज बँकेत दिला होता. हे म्हणणे खरे नाही की तुम्हाला तुमचे पैसे व्याजासहीत परत करु केवळ तुम्ही पोलीसांसमोरील जबाबात फक्त गौतम जाधवचे नाव घ्या असे मला बँकेने सांगितल्याने मी आज गौतम जाधवविरुध्द खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की ज्यावेळी मी बँकेत माझे पैसे मिळण्याबाबत वारंवार जायचो त्यावेळी मला बँकेकडुन उडवाउडवीची उत्तरे मिळायची की जसे प्रिंटर चालत नाही, लाईट बंद आहे. हे म्हणणे खरे आहे की बँक मॅनेजरकडे मी माझे स्टेटमेंट अनेक वेळा

मागितल्यानंतर मला माझे स्टेटमेंट मिळाले होते.

प्रश्न– आरोपीने तुम्हाला उडवाउडवीची उत्तरे दिली होती का?

उत्तर– आरोपी व माझी नंतर भेट झाली नाही.

आरोपीशी त्याच्या मोबाईल नंबरवर मी माझ्या पैश्यांबाबत विचारपुस करण्याचा प्रयत्न केला होता परंतु आरोपीचा मोबाईल नंबर लागला नाही. ज्यावेळी मी बँकेत माझ्या पैश्यांबाबत विचारण्यासाठी गेलो त्यावेळी बँकेने मला आरोपीकडे जावुन तुमच्या पैश्यांबाबत विचारपुस करा असे काही बँकेने सांगितले नाही. हे मला सांगता येणार नाही की बँक मला माझ्या पैश्यांबाबत उडवाउडवीची उत्तरे देत असल्याने केवळ बँकेने हा अपहार केला असावा. हे म्हणणे खरे आहे की माझ्या पैश्यांबाबत अपहार नेमका गौतम जाधवने केला की बँकेने केला याबाबत मला माहीती नाही. मला आता माझे पैसे व्याजासहीत मिळाल्यामुळे माझी आरोपीविरुध्द काही तक्रार राहीलेली नाही. मला स्पेशल ऑडीट झाले एवढे माहीती असून त्याबाबत इतर काही माहीती नाही. स्पेशल ऑडीटचा रिपोर्ट मी पाहीलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की गौतम जाधवचा या अपहाराशी काही संबंध नसताना बँकेने मला माझे पैसे परत करावेत केवळ या कारणास्तव मी गौतम जाधवविरुध्द खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती

सही/–

(एन.एस.सबनीस)

दिनांकः २२/०९/२०२५.

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.२,

पारनेर.